प्रकरण १.

# भारतातील शैक्षणिक विचारवंत


**१.१ रवींद्रनाथ टागोर**
- १.१.१ रवींद्रनाथ टागोर यांचे शैक्षणिक विचार
- १.१.२ रवींद्रनाथ टागोर यांचे शैक्षणिक योगदान

**१.२ स्वामी विवेकानंद**
- १.२.१ स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक विचार
- १.२.२ स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक योगदान

**१.३ महात्मा गांधी**
- १.३.१ महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार
- १.३.२ महात्मा गांधी यांचे शैक्षणिक योगदान

**१.४ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन**
- १.४.१ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे शैक्षणिक विचार
- १.४.२ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे शैक्षणिक योगदान

**१.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
- १.५.१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार
- १.५.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक योगदान


भारतात अनेक शैक्षणिक विचारवंत होऊन गेलेत. त्यांपैकी काहींचे शैक्षणिक विचार व शैक्षणिक योगदान यांविषयीची माहिती आपण या प्रकरणातून अभ्यासणार आहोत.


## १.१ रवींद्रनाथ टागोर

**सांगा पाहू**

★ विश्व प्रतिष्ठेचा साहित्याचा नोबेल पुरस्कार मिळवणारे पहिले भारतीय कवी कोण?

★ भारताचे 'जनगणमन' हे राष्ट्रगीत कोणी लिहिले?

रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकाता येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण खासगी शिक्षकांकडून त्यांच्या स्वगृही झाले, तर उच्च शिक्षण सेंट झेवियर महाविद्यालय, कोलकाता येथे झाले. रवींद्रनाथ टागोर यांना १९१३ साली 'गीतांजली' काव्यसंग्रहासाठी साहित्याचा नोबेल पुरस्कार मिळाला, तसेच कोलकाता विद्यापीठाकडून डी.लिट. ही सर्वोच्च पदवी मिळाली. १९१५ साली ब्रिटिश सरकारतर्फे 'सर' ही पदवी प्रदान केली गेली. टागोर यांचे ७ ऑगस्ट १९४१ रोजी निधन झाले.



रवींद्रनाथ टागोर यांचे वडील देवेंद्रनाथ टागोर, हे राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केलेल्या ब्राह्मो समाजाचे पुरस्कर्ते होते, तर आई शारदादेवी या धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या, यामुळे रवींद्रनाथ टागोर यांना घरामध्ये धार्मिक व पुरोगामी वातावरणाचे सान्निध्य लाभले.

**माहीत आहे का तुम्हांला?**

रवींद्रनाथ टागोर १८७८ साली उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले; पण तिथे त्यांचे शिक्षणात मन रमत नव्हते, त्यामुळे १८८० साली कोणतीही शिक्षणाची पदवी न मिळवता ते भारतात परत आले.

औपचारिक शिक्षण देणाऱ्या शाळा या त्यांना कोंडवाडा वाटत असत. औपचारिक शिक्षणाच्या जोखडामधून बालकांना बाहेर काढण्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे या प्रबळ इच्छाशक्तीमधून रवींद्रनाथ टागोर यांनी 'शांतिनिकेतन' या शाळेची स्थापना केली. 'शांतिनिकेतन' शाळेमध्ये शिक्षणविषयक अनेक शैक्षणिक प्रयोग राबवले गेले. याच शैक्षणिक प्रयोगांमुळे एक शैक्षणिक विचारवंत म्हणून त्यांची कीर्ती संपूर्ण जगभर पसरली.

### १.१.१ रवींद्रनाथ टागोर यांचे शैक्षणिक विचार

(१) **शिक्षणाची व्याख्या –** रवींद्रनाथ टागोर यांनी ''शिक्षण म्हणजे आत्माविष्कार'' अशी शिक्षणाची व्याख्या केली आहे.

(२) **अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत बालकांना पूर्ण स्वातंत्र्य द्यावे –** रवींद्रनाथ टागोर यांच्या मते, अध्ययन करण्यासाठी बालकांना संपूर्ण स्वातंत्र्य असावे. बालकांच्या अध्ययनासाठी नैसर्गिक मार्गाचा अवलंब केला पाहिजे. कृत्रिम वातावरणातील अध्ययनापेक्षा नैसर्गिक वातावरणात बालक उत्तम प्रकारे अध्ययन करू शकते, त्यामुळे बालकांच्या अध्ययनादरम्यान शिक्षकांनी अधिकाधिक प्रमाणात बालकांच्या स्वातंत्र्याला आणि नैसर्गिक अभिव्यक्तीला वाव देता येईल अशाच अध्यापन पद्धतीचा वापर करावा.

(३) **शिक्षणातून बालकांचा सर्वांगीण विकास व्हावा –** शिक्षणातून बालकांच्या बौद्धिक, भावनिक आणि कृतियुक्त विकासासोबतच भौतिक, सामाजिक, सर्जनात्मक अभिरुची यांचा व यांच्यातून परस्पर सहसंबंध साधण्याचा विकास झाला पाहिजे. अभ्यासक्रमाची निर्मिती करीत असताना आणि अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना समजावून देत असताना शिक्षणतज्ज्ञांनी आणि शिक्षकांनी या बाबींकडे आवर्जून लक्ष द्यावे.

(४) **बालकांच्या मानसिक स्वातंत्र्यासाठी शिक्षण –** बालकांना स्वावलंबी, निर्णयक्षम, सर्जनशील बनवायचे असेल, तर त्यांना शिक्षण घेण्याचे, शिक्षणातील विषय निवडण्याचे, भाषा माध्यम निवडण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. शाळा, पालक, शिक्षकांकडून असे स्वातंत्र्य दिल्यास बालके नक्कीच आपापल्या क्षेत्रात किंवा विषयात निपुण होऊ शकतील.

(५) **शिक्षणाच्या ध्येय प्राप्तीसाठी आत्मिक विकासाची गरज –** रवींद्रनाथ टागोर यांच्या मते, शिक्षणाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी मानसिक प्रेरणेची आवश्यकता असते. मानसिक प्रेरणा जितक्या प्रभावी तितक्या प्रमाणात शिक्षणाची उद्दिष्टे लवकर साध्य होतात. बालकाचा आत्मिक विकास घडवून आणावयाचा असेल, तर त्याला मुक्त किंवा खुले वातावरण उपलब्ध करून दिले पाहिजे.

(६) **शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे –** रवींद्रनाथ टागोर यांच्या मते, एखादा अभ्यासविषय बालकांना सोप्यातसोप्या पद्धतीने समजावून सांगावयाचा असेल, कमीतकमी वेळेत परिपूर्णरीत्या समजावून द्यावयाचा असेल, तर मातृभाषेशिवाय पर्याय नाही.

(७) **वर्गाध्यापनात शिक्षकांनी स्वयंशिस्तीवर भर द्यावा –** वर्गाध्यापनामध्ये विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त लावावयाची असेल, तर ती शिक्षेच्या माध्यमातून किंवा बाहेरून लादण्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या आतून निर्माण करावी. आतून निर्माण झालेली शिस्त विद्यार्थ्यांमध्ये दीर्घकाळापर्यंत टिकून राहील.

(८) **शिक्षण जीवनाशी निगडित असावे –** शिक्षण हे जीवनानुगामी असावे, यावर रवींद्रनाथ टागोर यांचा भर होता. बालकांना पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष वातावरणानुरूप शिक्षण दिले जावे. प्रत्येक विषय परिस्थितीनुरूप शिकवले पाहिजेत आणि त्यातून बालकास उपयुक्त असणारे जीवनानुभवी ज्ञान दिले पाहिजे.

(९) **चारित्र्यसंवर्धनासाठी शिक्षण –** बालकाच्या चारित्र्यसंवर्धनासाठी योग्य वातावरण व योग्य शिक्षणाची गरज असते. शिक्षणातून बुद्धी आणि मन योग्य प्रकाराने विकसित झाल्यास त्यातून नक्कीच चारित्र्यसंवर्धन घडून येईल. चारित्र्यसंवर्धनाच्या बाबतीत रवींद्रनाथ टागोर नेहमी म्हणत असत :

When wealth is lost, nothing is lost.
When health is lost, something is lost.
But when character is lost, everything is lost.

(१०) **संपूर्ण सृष्टीशी जीवनाचे सामंजस्य प्रस्थापित करण्यासाठी शिक्षण –** रवींद्रनाथ टागोर यांनी आपल्या 'पर्सनॅलिटी' या पुस्तकात शिक्षणाविषयी माहिती सांगितली असून, जे संपूर्ण सृष्टीशी आपल्या जीवनाचे सामंजस्य प्रस्थापित करू शकते तेच सर्वोत्तम शिक्षण होय. रवींद्रनाथ टागोर यांच्या मते, शिक्षण ही विकासाची प्रक्रिया ठरण्यासाठी परमोच्च स्थान गाठणे अगत्याचे

आहे. या शिखरावर व्यक्तीला पोहोचवणे म्हणजे पूर्ण व्यक्तिमत्त्व प्राप्त करून देणे होय.

**माहीत आहे का तुम्हांला?**

आपले ‘जनगणमन’ हे राष्ट्रगीत मूळ बंगाली भाषेत आहे. एकूण पाच कडव्यांच्या या गीतातील एकच कडवं आपण आपले राष्ट्रगीत म्हणून निवडले आहे.

**इंटरनेट माझा मित्र**

इंटरनेटद्वारे रवींद्रनाथ टागोर यांनी बंगाली भाषेत लिहिलेले पाच कडव्यांचे राष्ट्रगीत मिळवा व श्रवण करा.

### १.१.२ रवींद्रनाथ टागोर यांचे शैक्षणिक योगदान

**(१) शांतिनिकेतन शाळा –** रवींद्रनाथ टागोर यांनी कोलकात्यापासून जवळच असलेल्या बोलपूर या गावी १९०१ मध्ये शांतिनिकेतन शाळेची स्थापना केली. आपल्या शैक्षणिक विचारांना मूर्त स्वरूप देणे हा शांतिनिकेतन शाळा स्थापण्यामागचा उद्देश होता. या शाळेतील सर्व वर्ग खुल्या वातावरणात भरत असत. निसर्गरम्य वातावरणात शिक्षक, विद्यार्थी एकत्र रहात. एकत्र राहण्यामधून, भोजनामधून विद्यार्थ्यांच्या स्वावलंबन व श्रमप्रतिष्ठेचा विकास घडत असे. या शाळेमध्ये बागकाम, पुस्तक बांधणी, सुतारकाम, संगीत, नाट्य, नृत्य, साहित्य इत्यादी विषय शिकवण्याची सोय होती. अध्ययन-अध्यापनाचे प्रमुख माध्यम मातृभाषा होते. वेळ प्रसंगी मातृभाषेसोबतच इंग्रजी आणि हिंदी भाषांचाही वापर अध्यापनासाठी होत असे. एकंदरीत, या शाळेमध्ये संपूर्ण वातावरण नैसर्गिक होते.

- **शांतिनिकेतन शाळेची वैशिष्ट्ये**

(१) शांतिनिकेतन ही एक वसतिगृहयुक्त शाळा होती.

(२) प्रत्येक दिवशी शाळेची सुरुवात व शेवट सुमधूर संगीताने होत असे.

(३) शाळेतील वातावरण नैसर्गिक स्वरूपाचे होते.

(४) शाळेतील सर्वच शिक्षक आपापल्या विषयात व कलेत निष्णात होते.

(५) स्वतंत्र वातावरणामध्ये विद्यार्थी आणि शिक्षक अध्ययन अनुभव घेत असत.

(६) वसतिगृहातील सर्व कामे विद्यार्थ्यांना स्वतःला करावी लागत असत.

(७) या शाळेमध्ये कृतियुक्त अध्ययनावर भर होता.

(८) शिक्षणाचे माध्यम मातृभाषा होती.

(९) शांतिनिकेतन शाळेचे तीन विभाग होते. वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत शिशु विभाग, वयाच्या दहा ते पंधरा वर्षापर्यंत मध्य विभाग तर आद्य विभागात पंधरा वर्षानंतरच्या मुलांचा समावेश होता.

**चर्चा करा**

शांतिनिकेतन शाळेमधील नैसर्गिक शिक्षण पद्धती आणि आजची औपचारिक शिक्षण पद्धती या दोन शिक्षण पद्धतींच्या साम्य आणि भेदांवर आपापल्या गटांमध्ये चर्चा करा.

**(२) विश्वभारती विद्यापीठ –** १९२१ साली रवींद्रनाथ टागोर यांनी शांतिनिकेतन या शाळेचे विश्वभारती विद्यापीठात रूपांतर केले. विश्वभारती या शब्दातील ‘भारती’ या शब्दाचा अर्थ ‘संस्कृती’ असा होतो, यावरून विश्वाच्या संस्कृतीची निर्मिती करणारे विद्यापीठ म्हणजे विश्वभारती विद्यापीठ होय. विश्वभारती विद्यापीठ हे आंतरराष्ट्रीय विद्यापीठ म्हणून विख्यात असून ‘यत्रविश्वं भवति एक नीडम्’ हे या विद्यापीठाचे ब्रीदवाक्य आहे. याचा अर्थ, ‘संपूर्ण विश्व हे एक घरटे आहे.’ सोबतच या नावामधून ‘वसुधैव कुटुंबकम्’ ची भावना प्रतीत होते.

- **विश्वभारती विद्यापीठाची वैशिष्ट्ये**

(१) विश्वभारती विद्यापीठामध्ये बालकमंदिरापासून ते पदव्युत्तर आणि संशोधनापर्यंतच्या शिक्षणाची सोय होती.

(२) विश्वभारती विद्यापीठामध्ये विविध आंतरराष्ट्रीय भाषा व संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी अनेक संशोधन केंद्रे कार्यान्वित होती.

(३) विश्वभारती विद्यापीठात गणवेशाची सक्ती होती.

(४) परदेशी विद्यार्थ्यांना भारतीय कला, साहित्य आणि संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी इंग्रजी भाषेची उपलब्धता करून देण्यात येत असे.

(५) विद्यापीठात गुणवत्तेनुसार शुल्कात सवलत होती.

(६) विद्यार्थ्यांना निवासासाठी वसतिगृहाची सुविधा उपलब्ध होती.

(७) विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी प्रत्येक विभागासाठी एक स्वतंत्र व एक मध्यवर्ती ग्रंथालय उपलब्ध होते.

(८) विश्वभारतीमधील वातावरण घरगुती व आध्यात्मिक स्वरूपाचे होते.

(९) विश्वभारती विद्यापीठामध्ये पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्कृतीचा संगम पहावयास मिळतो.

(१०) विश्वभारती विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबत सांस्कृतिक विकासावरही भर होता.

**(३) श्रीनिकेतन –** रवींद्रनाथ टागोर यांनी ६ फेब्रुवारी १९२२ रोजी कोलकात्याजवळील सुरूल या गावी श्रीनिकेतनची स्थापना केली. 'श्रीनिकेतन' या नावामधील 'श्री' चा अर्थ 'विकास किंवा कल्याण' असा होतो. श्रीनिकेतन ही तांत्रिक शाळा असून या शाळेमधून तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणावर भर होता. खेड्यातील जनतेला शिक्षण देऊन तेथील नैसर्गिक साधन सामग्रीचा वापर करून व्यक्ती व परिसराचा विकास करणे हा श्रीनिकेतन स्थापण्यामागचा मुख्य उद्देश होता.

- **श्रीनिकेतनची वैशिष्ट्ये**

(१) श्रीनिकेतन ही ग्रामीण माध्यमिक शाळा असून या शाळेत तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाची सोय होती.

(२) श्रीनिकेतनला शिक्षासत्र असेही संबोधले जात होते.

(३) श्रीनिकेतनमधून पायाभूत शिक्षण दिले जात होते.

(४) श्रीनिकेतनच्या माध्यमातून शिक्षण, कृषी, समाजकार्य इत्यादी कार्ये पार पाडली जात होती.

(५) श्रीनिकेतनचा समावेश विश्वभारती विद्यापीठांतर्गत झालेला होता.

**इंटरनेट माझा मित्र**

इंटरनेटच्या आधारे रवींद्रनाथ टागोर यांच्या 'शांतिनिकेतन' मधील अध्ययन-अध्यापन पद्धतींच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करा.

## १.२ स्वामी विवेकानंद

**सांगा पाहू**

राष्ट्रीय युवा दिन म्हणून आपण कोणाचा जन्मदिवस साजरा करतो?

स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण मेट्रोपॉलिटन स्कूल, कोलकाता येथे झाले, तर उच्च शिक्षण प्रेसिडेन्सी कॉलेज, कोलकाता येथे झाले. स्वामी विवेकानंद यांचे ४ जुलै १९०२ रोजी निधन झाले.



स्वामी विवेकानंद यांचे बालपणीचे नाव नरेंद्र होते. स्वामी विवेकानंद यांचे वडील विश्वनाथ दत्त कोलकाता उच्च न्यायालयात वकिलीचा व्यवसाय करत असत, तर आई भुवनेश्वरीदेवी धार्मिक वृत्तीच्या होत्या. नरेंद्रच्या जीवनावर घरातील धार्मिक वातावरणाचा प्रभाव होता.

बालवयापासूनच स्वामी विवेकानंद अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्तेचे होते. त्यांना तत्त्वज्ञानाचा व्यासंग जडला. स्वामी विवेकानंदांची ही तत्त्वज्ञानाची जिज्ञासा पाहून प्राचार्य रेण्हरंड हेस्टी यांनी त्यांना श्री रामकृष्ण परमहंस यांची माहिती दिली. १८८१ साली श्री रामकृष्ण परमहंसांची भेट घेतली असताना ईश्वरी साक्षात्काराची तळमळ असणाऱ्या स्वामी विवेकानंदांनी श्री रामकृष्ण परमहंस यांना प्रश्न विचारला, 'तुम्ही परमेश्वर पाहिला आहे का?' रामकृष्ण परमहंस यांनीही रोखठोकपणे व आत्मविश्वासाने उत्तर दिले, की 'मी तर परमेश्वर

पाहिला आहेच; पण तुलाही दाखवतो.' हाच प्रसंग परिवर्तनाचा क्षण ठरला व स्वामी विवेकानंद यांनी रामकृष्ण परमहंसांचे शिष्यत्व पत्करले.

**माहीत आहे का तुम्हांला?**

१८९३ साली अमेरिकेतील शिकागो शहरात जागतिक सर्वधर्म परिषद भरली होती. या परिषदेसाठी भारताकडून हिंदू धर्माचे प्रतिनिधी म्हणून स्वामी विवेकानंद उपस्थित होते. या परिषदेस संबोधित करताना 'माझ्या बंधू आणि भगिनींनो' या शब्दांचा उच्चार करताच संपूर्ण सभागृहामध्ये टाळ्यांचा कडकडाट झाला होता. त्या परिषदेमध्ये स्वामी विवेकानंदांनी 'वेदान्त तत्त्वज्ञान व हिंदू धर्माची सर्वसमावेशकता' या विषयावर आपले परखड विचार मांडले होते. त्यांच्या या हिंदू धर्माच्या प्रतिनिधित्वामुळे भारताच्या हिंदू धर्माची वैभवशाली पताका सर्वदूर फडकली.

### १.२.१ स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक विचार

(१) **शिक्षणाची व्याख्या –** स्वामी विवेकानंदांच्या मते, ''मानवातील पूर्णत्वाची अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय.''

(२) **शीलसंवर्धन हे शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे –** शीलसंवर्धनाचे महत्त्व पटवून देत असताना स्वामी विवेकानंद म्हणतात, की आपली इच्छाशक्ती व्यवस्थितपणे व्यक्त करणे आणि योग्य प्रकारे तिचा संयम राखणे हे शिक्षणाचे खरे कार्य आहे. शीलसंवर्धनासाठी मुलांवर चांगले संस्कार करणे ही पालक व शिक्षकांची जबाबदारी आहे. चांगल्या सवयी लावल्यास त्यातून उत्तम शीलसंवर्धन होईल.

(३) **स्त्रीपुरुषांना शिक्षणाची समान संधी –** स्त्री आणि पुरुष यांच्या अंत:करणात एकाच स्वरूपाचे आत्मतत्त्व असते, त्यामुळे जन्माबरोबर पुरुषांना जे हक्क आणि अधिकार प्राप्त होतात, तेच हक्क आणि अधिकार स्त्रियांनादेखील प्राप्त झाले पाहिजेत.

(४) **शारीरिक शिक्षणास महत्त्व –** स्वामी विवेकानंदांनी आत्मिक शिक्षणाइतकेच शारीरिक शिक्षणास महत्त्व दिले आहे. त्यांच्या मते, सामर्थ्य हे जीवन आणि दौर्बल्य हा मृत्यू होय.

(५) **एकाग्रतेचा विकास करण्यासाठी शिक्षण –** मनाची एकाग्रता ही ज्ञान प्राप्तीची गुरूकिल्ली होय. त्यांच्या मते, ज्ञान प्राप्त करून घ्यावयाचे असेल, तर ब्रह्मचर्य व श्रद्धा यांची मदत घेतली पाहिजे. केवळ शिक्षणामध्येच नाही, तर जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत मनाची एकाग्रता महत्त्वाची आहे.

(६) **शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे –** स्वामी विवेकानंद यांच्या मतानुसार शिक्षण हे मातृभाषेतून देण्याची तरतूद असावी. मातृभाषेतून दिलेल्या ज्ञानाचे विद्यार्थ्यांना लवकर आकलन होते, म्हणून शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे.

(७) **शिक्षणातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सामंजस्याची भावना वाढीस लागली पाहिजे –** व्यक्तीच्या मनात विशाल दृष्टी विकसित करण्याचे एक साधन म्हणजे शिक्षण होय. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सामंजस्याची भावना निर्माण करता येते.

(८) **अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी शिक्षण –** व्यक्तीच्या विचारसरणीत बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य शिक्षणात असते. शिक्षणाच्या माध्यमातून आपणांस एखाद्या व्यक्तीला अंधश्रद्धेचे दुष्परिणाम व विज्ञानाचे महत्त्व पटवून देता येते. जेव्हा व्यक्तीस अंधश्रद्धेचे दुष्परिणाम समजतील, तेव्हाच तिच्याकडून वाईट रुढी, प्रथा, परंपरा व अंधश्रद्धा याला मूठमाती मिळेल.

**माहीत आहे का तुम्हांला?**

स्वामी विवेकानंद यांनी आपला देश कसा आहे? आपल्या देशासमोरील समस्या कोणत्या आहेत? आपल्या देशाला आध्यात्मिक वरदान कसे लाभलेले आहे? राष्ट्रीय एकात्मतेसमोरील अडथळे कोणते? यांचा अभ्यास करण्यासाठी १८८८ ते १८९१ या कालावधीत संपूर्ण भारत भ्रमण केले.

### १.२.२ स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक योगदान

स्वामी विवेकानंद यांनी आपल्या धार्मिक व शैक्षणिक विचारांच्या प्रसारार्थ दि. १ मे १८९७ रोजी

'रामकृष्ण मिशन' ची स्थापना केली. या मिशनचे कार्य मठ आणि मिशन या विभागाद्वारे चालत असे. मठात शिष्य व वैराग्ययुक्त साधूंचा निवास असायचा. मठातून शिक्षक आणि कार्यकर्ते तयार केले जात, तर मिशनचे कार्य समाजाची सेवा करणे हे होते.

- **रामकृष्ण मिशनची वैशिष्ट्ये**

(१) रामकृष्ण मिशनची विभागणी मठ आणि मिशन अशा दोन गटांत केलेली होती.

(२) मठाच्या माध्यमातून शैक्षणिक विचारांचा प्रसार करण्यात येत होता.

(३) शिक्षणाच्या प्रसाराकरिता शिशू शाळा, शाळा आणि महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली होती.

(४) शिक्षकांसाठी प्रशिक्षणाची सोय मठामध्ये होती.

(५) शाळा आणि महाविद्यालयांमधून तात्त्विक शिक्षणासोबतच व्यावसायिक शिक्षणाचीही सोय होती.

(६) मठाकडून नियमितपणे ग्रंथ आणि नियतकालिके प्रकाशित करण्यात येत होते.

(७) मिशनचा भर हा सेवेवर होता, यासाठी अपंगांसाठी अपंगालये, रुग्णांसाठी रुग्णालये, दुष्काळ पीडितांसाठी मदत इत्यादी कार्यांचा समावेश होता.

**लक्षात ठेवा**

'उठा, जागे व्हा व ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका.' हा स्वामी विवेकानंद यांनी दिलेला मूलमंत्र वस्तुत: उपनिषदातून आलेला संस्कृत मंत्र असून तो पुढीलप्रमाणे आहे.

'उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत'

या संस्कृत मंत्राचा स्वामी विवेकानंद यांच्या शब्दांत इंग्रजी अनुवाद 'Arise, awake and stop not till, the goal is reached.' असा आहे.

**इंटरनेट माझा मित्र**

इंटरनेटच्या आधारे रामकृष्ण मिशनच्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती घ्या.


## १.३ महात्मा गांधी

**सांगा पाहू**

★ भारताचे राष्ट्रपिता म्हणून कोण ओळखले जातात?

★ भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सर्वप्रथम अहिंसक मार्गाचा अवलंब कोणी केला?

महात्मा गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर या गावी झाला. त्यांनी राजकोट हायस्कूल, राजकोट येथून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली असून युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ लंडन लॉ स्कूल, लंडन येथून वकिलीची परीक्षा उत्तीर्ण केली. महात्मा गांधी यांचे ३० जानेवारी १९४८ रोजी निधन झाले.



महात्मा गांधी यांचे वडील करमचंद गांधी हे राजकोट संस्थानाचे दिवाण होते. आई पुतळाबाई या धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. आईच्या संस्काराचा खूप मोठा प्रभाव महात्मा गांधी यांच्यावर होता. महात्मा गांधी यांचे 'माझे सत्याचे प्रयोग' हे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे.

**माहीत आहे का तुम्हांला?**

१८९१ साली लंडनहून बार ॲट लॉ ही वकिलीची परीक्षा पास केल्यानंतर महात्मा गांधी यांनी राजकोट येथे वकिलीचा व्यवसाय सुरू केला. त्यांना १८९३ साली एक खटला चालवण्यासाठी दक्षिण आफ्रिकेस जावे लागले. दक्षिण आफ्रिकेत काळा, गोरा असा वर्णभेद केला जात असे. याच भेदामधून महात्मा गांधी यांना दरबान येथे रेल्वे डब्यातून अपमान करण्याचा हृदयद्रावक व कटू अनुभव आला. या वाईट अनुभवानंतर महात्मा गांधी यांनी वर्णद्वेष विरुद्ध उघडउघड बंड पुकारले.

### १.३.१ महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार

(१) **शिक्षणाची व्याख्या –** महात्मा गांधी यांच्या मते, ‘‘केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. शिक्षणाचा प्रारंभदेखील नव्हे; आत्मा व मन यांचा परिपूर्ण विकास करून व्यक्तीमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती करणे हे शिक्षणाचे खरे ध्येय होय.’’

(२) **शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे –** मातृभाषेमुळे विद्यार्थ्यांस अध्ययनातील श्रवण, भाषण, वाचन, लेखन आणि मनन या क्रिया सोप्या वाटतात. याच क्रियांमधून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा विकास घडून येतो, त्यामुळेच शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे असा विचार महात्मा गांधी यांचा होता.

(३) **प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे –** भारतामध्ये ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्वच मुलामुलींना शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात यावे, यामुळे समाजातील सर्व स्तरांतील मुलामुलींना शिक्षण घेता येईल व भारतामध्ये यातून शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक समता प्रस्थापित करता येईल.

(४) **शिक्षण हस्तकलाकेंद्रित असावे –** हस्तकलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या क्रियाशीलतेला चालना मिळेल व विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि बौद्धिक शक्तीचा विकास घडवून आणता येईल, त्यामुळे शिक्षणात हस्तकलेला महत्त्वाचे स्थान असावे.

(५) **शिक्षणातून स्वावलंबनाचा विकास –** विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर बनवायचे असेल, तर प्रथमतः त्यांना स्वावलंबी बनवावे लागेल, त्यामुळे शिक्षणातून स्वावलंबनाचा विकास झाला पाहिजे.

(६) **शिक्षण जीवनाभिमुख असावे –** अध्ययन विषयाचा सहसंबंध जोपर्यंत जीवनाशी जोडला जात नाही, तोपर्यंत अध्ययनात अभिरुची आणि एकाग्रता येणार नाही. म्हणून प्रत्येक विषयामधून जीवन शिक्षण देण्याचा व जीवनाशी समवाय जोडण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

(७) **मानसशास्त्रीय आधारावर अभ्यासक्रमाची रचना असावी –** अभ्यासक्रमाची मांडणी करीत असताना आणि देवाणघेवाण करीत असताना त्यास मानसशास्त्रीय आधार हवा. ज्यांच्यासाठी अभ्यासक्रम विकसित करावयाचा आहे, त्यांचे वय, आवड, अनुभवविश्व, क्षमता इत्यादी बाबी विचारात घेऊन अभ्यासक्रम विकसित करावा.

(८) **शिक्षणाचा हेतू सुजाण नागरिक तयार करणे हा असावा –** शिक्षणाच्या माध्यमातून लोकशाहीचा पुरस्कार करणारे, देशप्रेमी, चारित्र्यसंपन्न, उद्योगप्रिय, स्वावलंबी व जबाबदार नागरिक तयार झाले पाहिजेत.

(९) **शारीरिक शिक्षणास महत्त्व –** सुदृढ शरीरात सुदृढ मन वास्तव्य करत असते, त्यामुळे शिक्षणातून बौद्धिक विकासासोबत शारीरिक विकासालादेखील महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे.

(१०) **चारित्र्यनिर्मिती हा शिक्षणाचा खरा पाया आहे –** गांधीजींच्या मते, साक्षरतेपेक्षाही अधिक महत्त्व चारित्र्यनिर्मितीस दिले पाहिजे. शिक्षणाचे अंतिम ध्येय चारित्र्यनिर्मिती हे असले पाहिजे.

### १.३.२ महात्मा गांधी यांचे शैक्षणिक योगदान

(१) गांधीजींनी १९०४ साली दक्षिण आफ्रिकेमध्ये ‘फिनिक्स’ आश्रमाची स्थापना केली.

(२) १९११ साली दक्षिण आफ्रिकेत ट्रान्सवाल या ठिकाणी टॉलस्टॉय आश्रमाची स्थापना केली.

(३) १९१५ साली गुजरातमधील अहमदाबादजवळील ‘कोचराब’ या गावी सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली.

(४) १९१७ साली बिहार येथील चंपारण्य जिल्ह्यात ग्रामशिक्षणाची सुरुवात केली.

(५) १९२० साली गुजरात विद्यापीठ स्थापन केले.

(६) १९३६ साली महाराष्ट्र राज्यात वर्धा शहराजवळ सेवाग्राम आश्रमाची स्थापना केली.

(७) १९३७ साली महाराष्ट्र राज्यातील वर्धा या ठिकाणी भरलेल्या अखिल भारतीय शिक्षण परिषदेमधून ‘मूलोद्योगी शिक्षण योजना’ मांडली.

(८) गांधीजींच्या मूलोद्योगी शिक्षण योजनेमध्ये शैक्षणिक तत्त्वानुसार आदर्शवाद, निसर्गवाद, कार्यवाद, प्रयोगवाद आणि सामाजिक पुनर्रचनावाद या विविध प्रकारच्या तात्त्विक विचारांचा सुंदर समतोल दिसून येतो.

**माहीत असू द्या**

मूलोद्योगी शिक्षण योजनेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती.

(१) सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे.

(२) शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे.

(३) शिक्षण हे स्वाश्रयी असावे.

(४) शिक्षणात हस्तोद्योगाला प्राधान्य असावे.

**इंटरनेट माझा मित्र**

इंटरनेटच्या आधारे मूलोद्योगी शिक्षण संकल्पनेवर चालणाऱ्या शाळांची माहिती घ्या.

## १.४ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

**सांगा पाहू**

★ ५ सप्टेंबर हा कोणता दिन म्हणून साजरा करतात?

★ स्वतंत्र भारताचे पहिले उपराष्ट्रपती कोण?

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी तमिळनाडूमधील तिरुत्ताणी या गावी झाला.



त्यांचे प्राथमिक शिक्षण तिरुत्ताणी व बेल्लोर या गावी झाले असून ल्युथर मिशन हायस्कूल, तिरुपती येथून ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. मद्रास येथील मद्रास प्रेसिडेन्सी कॉलेजमधून त्यांनी बी. ए. (तत्त्वज्ञान), तसेच एम. ए. ची परीक्षा उत्तीर्ण केली. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे १७ एप्रिल १९७५ रोजी मद्रास येथे निधन झाले.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे वडील वीरास्वामी हे तहसिलदार होते, तर आई सीताम्मा या धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या.

**माहीत आहे का तुम्हांला?**

१९६२ साली डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जेव्हा भारताचे राष्ट्रपती म्हणून विराजमान होते, तेव्हा त्यांच्या काही विद्यार्थ्यांकडून त्यांच्याविषयीची कृतज्ञता म्हणून त्यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्याची इच्छा व्यक्त केली गेली. 'माझा जन्मदिवस जर तमाम भारतीय शिक्षकांचा गौरव दिवस म्हणून साजरा होणार असेल, तर मलाही आनंद होईल.' असे उद्‍गार काढत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी होकार दिला. तेव्हापासून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस ५ सप्टेंबर हा संपूर्ण भारतभर शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

### १.४.१ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे शैक्षणिक विचार

(१) **शिक्षणाची व्याख्या –** डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या मते,'' शिक्षणातून माणसे निर्माण झाली पाहिजेत. नुसते साक्षर निर्माण होऊन चालणार नाही. केवळ बौद्‍धिक धडाडी म्हणजे शिक्षण नव्हे, तर मनुष्याच्या विविध प्रवृत्ती आणि भावना यांना परिस्थितीनुरुप सुसंस्कृत वळण लावणे म्हणजे शिक्षण होय.''

(२) **शिक्षणातून मानवतेची जाणीव व्हायला हवी –** शिक्षणातून मानवतेसाठी आवश्यक प्रेम, माया, विश्वास, नीतिमूल्ये, दयाभाव, क्षमाशील वृत्ती, सहकार्य, आदर इत्यादी बाबी मिळायला हव्यात.

(३) **शिक्षणातून लोकशाहीची मूल्ये व जीवन पद्‍धती प्रस्थापित झाली पाहिजे –** आजचा विद्यार्थी उद्याचा भावी नागरिक आणि राष्ट्राचा आधारस्तंभ आहे, म्हणून आपल्या राष्ट्राच्या विकासासाठी उपयुक्त लोकशाहीची मूल्ये शिक्षणातून विद्यार्थ्यांत रुजवली पाहिजेत.

(४) **शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास व्हावा –** आपणांस जर २१ व्या शतकातील भारत आणि भारतातील विज्ञानवादी युवक घडवायचा असेल, तर शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास होणे गरजेचे आहे.

(५) **शिक्षणातून समतोल व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा –** शिक्षणातून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातील बोधात्मक, भावात्मक, क्रियात्मक अशा सर्वच क्षेत्रांचा विकास झाला पाहिजे, जेणेकरून शिक्षणामधून एक आदर्श नागरिक तयार होईल.

(६) **शिक्षणातून संस्कृतीचे संवर्धन झाले पाहिजे –** संस्कृती म्हणजे धर्म, आचार, विचार, चालीरिती, परंपरा, वेशभूषा या बाबी होत. आज पाश्चात्य संस्कृतीच्या संपर्कात येऊन आपली संस्कृती लयाकडे जात आहे, त्यामुळे शिक्षणातून आपल्या मूळ संस्कृतीचा ठेवा विद्यार्थ्यांना कळला पाहिजे. तो टिकवण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.

(७) **अभ्यासक्रमातून व्यक्ती, समाज आणि निसर्ग यांच्याविषयी परिपूर्ण ज्ञान मिळावे –** आपण ज्या परिसरात, समाजात, निसर्गात राहतो, त्याची वैशिष्ट्ये, त्याच्या गरजा, त्या गरजा पूर्ण करण्यासाठी आपणांकडून होत असलेले आवश्यक प्रयत्न यांचा अंतर्भाव अभ्यासक्रमामध्ये असावा.

(८) **शिक्षणातून स्वयंशिस्तीचे धडे मिळावेत –** व्यक्तिमत्त्व विकासात स्वयंशिस्त फार महत्त्वाची असते. स्वयंशिस्तीमुळे आपण आपल्या वर्तनामध्ये कायमस्वरूपाचे परिवर्तन घडवू शकतो, त्यामुळे शिक्षणातून स्वयंशिस्तीचे धडे मिळाले पाहिजेत.

(९) **स्त्रियांना शिक्षणाची व स्वयंविकासाची पूर्ण संधी मिळाली पाहिजे –** कोणत्याही समाजाची आध्यात्मिक आणि सांस्कृतिक स्थिती त्या समाजातील स्त्रियांच्या स्थितीवर अवलंबून असते, त्यामुळे कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय विकासासाठी स्त्री शिक्षणाचे व्यवस्थित नियोजन व्हावे.

### १.४.२ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे शैक्षणिक योगदान

(१) **विद्यापीठ शिक्षण आयोगाचे अध्यक्ष –** देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने भारतीय शिक्षणाची पुनर्रचना करण्याकरिता १९४८ साली विद्यापीठ शिक्षण आयोगाची नेमणूक केली होती. या आयोगाकडे भारतातील उच्च शिक्षणामध्ये आवश्यक ते बदल सुचवण्याचे कार्य सोपवलेले होते. या आयोगाचे अध्यक्ष म्हणून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली होती.

(२) **कुलगुरू पदाची महत्त्वपूर्ण कामगिरी –** डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना भारतामधील आंध्र विद्यापीठ (१९३१ ते १९३८) आणि बनारस हिंदू विद्यापीठ (१९३९-१९४८) या दोन महत्त्वपूर्ण विद्यापीठांच्या कुलगुरू पदावर काम करण्याची संधी मिळाली. या दोन विद्यापीठांचे कुलगुरू म्हणून डॉ. राधाकृष्णन यांनी अत्यंत कार्यक्षमपणे जबाबदारी पार पाडली असून कुलगुरू म्हणून कार्य कसे करावे याचा आदर्शच त्यांनी घालून दिला.

(३) **भारताचे राजदूत, उपराष्ट्रपती आणि राष्ट्रपती म्हणून कार्य –** डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी एक वेळा भारताचे रशियातील राजदूत (१९४८), दोन वेळा स्वतंत्र भारताचे उपराष्ट्रपती (१९५२-६२) आणि एक वेळा राष्ट्रपती (१९६२) म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

**इंटरनेट माझा मित्र**

इंटरनेटच्या आधारे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी लिहिलेल्या ग्रंथांची नावे लिहा.

### १.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**सांगा पाहू**

★ भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून कोणांस ओळखले जाते?

★ भारतीय जनतेला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र कोणी दिला?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण सातारा येथील कॅम्प मिलिटरी स्कूल येथे झाले. त्यांनी मुंबई येथील एल्फिन्स्टन महाविद्यालयातून बी.ए. ची पदवी, तर अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठामधून एम.ए., पीएच.डी. व एल.एल.डी.



पदव्या संपादन केल्या. लंडन विद्यापीठातून त्यांनी एम.एस्सी. व डी.एस्सी. पदव्या संपादन केल्या. ६ डिसेंबर १९५६ हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन होय.

रत्नागिरी जिल्ह्यातील आंबावडे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव. त्यांचे मूळ आडनाव आंबावडेकर होते. त्यांचे वडील सैन्यात नोकरीला होते, त्यामुळे घरातील वातावरण अत्यंत शिस्तीचे होते. याच शिस्तीमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन घडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'द बुद्ध अँड हिज धम्म' हा ग्रंथ लिहिला.

**माहीत आहे का तुम्हांला?**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक अडचण येत होती, त्यामुळे त्यांची ही अडचण दूर करण्यासाठी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना शिष्यवृत्ती देऊन उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले होते.

### १.५.१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार

(१) **शिक्षणाची व्याख्या –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, ''व्यक्तीला अस्तित्वाची, क्षमतांची, सामर्थ्याची जाणीव करून देते ते शिक्षण होय.''

(२) **विषमता नष्ट करण्याचा शिक्षण हाच राजमार्ग –** आज समाजामध्ये जात, धर्म, पंथ, लिंग, प्रांत यांसारख्या अनेक क्षेत्रांत विषमता असल्याची पाहावयास मिळते. या विषमतेमधून राष्ट्रीय एकात्मतेला व राष्ट्रीय विकासाला खूप मोठा अडथळा निर्माण होतो. प्रत्येकाच्या मनामधून ही विषमता घालवावयाची असेल, तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही.

(३) **शिक्षण हीच शोषणमुक्तीची पायवाट होय –** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, व्यक्ती किंवा समाजाला शोषणापासून मुक्ती मिळवून घ्यावयाची असेल, तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. अनेक वर्षांपासून शोषणाला बळी पडलेल्या आपल्या बांधवांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा नारा दिला.

(४) **समानतेसाठी शिक्षण –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, समता म्हणजे खालच्या वर्गाची पातळी वरच्या वर्गाच्या पातळीपर्यंत आणणे होय. खालच्या पातळीतील लोकांना वरच्या पातळीपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांना शिक्षण देणे गरजेचे असते; परंतु शिक्षण देत असताना ते विशेष सवलतीच्या स्वरूपात दिले पाहिजे.

(५) **शिक्षण हे मानवी मनाची अन्न व शक्ती आहे –** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला अन्न व शक्तीची उपमा दिली आहे. अन्नामुळे केवळ व्यक्तीचे शरीर सुदृढ होईल; पण शिक्षणामुळे मस्तिष्क, मन आणि विचार सुदृढ होतील आणि हे सुदृढ विचार व्यक्तीस आयुष्यभर शक्तिवर्धक म्हणून कार्य करतील.

(६) **शिक्षणातून शिस्तीचा विकास –** व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासात शिस्तीचे स्थान महत्त्वाचे आहे. शिस्तीमुळेच व्यक्तीमध्ये विनय निर्माण होतो, त्यामुळे शिक्षणातून शिस्तीचा विकास झाला पाहिजे.

(७) **चारित्र्यसंवर्धनासाठी शिक्षणाची गरज –** चरित्र आणि चारित्र्य या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत. जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीस चरित्र असते; पण त्या व्यक्तीला चारित्र्य असेलच असे सांगता येत नाही. चारित्र्यसंवर्धन म्हणजे प्रज्ञा, शील, करुणा आणि मैत्री या गुणांचे संवर्धन होय. शिक्षणातून चारित्र्यसंवर्धनाची गरज पटवून दिली पाहिजे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होते.

(८) **शिक्षणास मूल्यांचे अधिष्ठान असावे –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, शिक्षण हे

मूल्याधिष्ठित असावे, शिक्षणातून बालकाच्या मनावर योग्य प्रभाव पडला पाहिजे. शिक्षणातून मानवता, परोपकार, विनम्रता, शुद्धता, निर्णयक्षमता, नैतिकता यांसारखी मूल्ये रुजली पाहिजेत. या गुणांमुळेच बालकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडून येईल. परिणामी शिक्षणास मूल्यांचे अधिष्ठान प्राप्त होईल.

(९) **प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले पाहिजे –** ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे, ज्यामुळे सर्वसामान्यांच्या मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध होऊन प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होईल.

(१०) **पालकांनी मुलांच्या शिक्षणासोबतच मुलींच्याही शिक्षणास प्रोत्साहन दिले पाहिजे –** आज स्त्रियांना शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. स्त्रियांना शिक्षणाची संधी देणे, म्हणजे त्यांचा सन्मान करणे होय. म्हणून पालकांनी मुलांच्या शिक्षणाइतकेच मुलींच्याही शिक्षणास प्रोत्साहन द्यावे, जेणेकरून मुली शिक्षणाच्या प्रवाहात येतील.

### १.५.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक योगदान

(१) **बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जनसामान्यांना विशेषतः तत्कालीन अशिक्षित, शोषित, पीडित, मागास जनतेला शिक्षण घेता यावे, म्हणून वसतिगृहाच्या स्थापनेची मोहीम राबवली होती. याच उद्देशासाठी त्यांनी २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हे या सभेचे ब्रीदवाक्य होते. बहिष्कृत हितकारिणी सभेकडून विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, विद्या आणि समाजसेवा यांविषयी अभिरुची व प्रेम निर्माण व्हावे, यासाठी 'सरस्वती विलास' नावाचे मासिक सुरू केले होते.

(२) **दलितवर्ग शिक्षण संस्थेची स्थापना –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितवर्गातील मुलांना दर्जेदार शालेय शिक्षण मिळावे, यासाठी १९२८ साली दलितवर्ग शिक्षण संस्थेची स्थापना केली. ज्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता, अशा विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश दिला जात असे. दलितवर्ग शिक्षण संस्थेचा उदात्त हेतू पाहता शासनाने या संस्थेस पाच वसतिगृहांची मान्यता दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या संस्थेचे प्रमुख कार्यवाहक म्हणून भूमिका बजावत होते.

(३) **पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मागासलेल्या वर्गात विशेषतः अनुसूचित जातीमध्ये उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याच्या हेतूने मुंबई येथे ८ जुलै १९४५ रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.

पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या अंतर्गत ज्यांना विविध कारणांमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागले होते, अशांसाठी २० जून १९४६ रोजी सिद्धार्थ कला आणि विज्ञान महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. अस्पृश्य आणि मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाकडे लक्ष देण्यासाठी, उच्च शिक्षणामधून विद्यार्थ्यांमध्ये विद्या, विनय आणि शील घडवण्यासाठी १९ जून १९५० रोजी औरंगाबाद येथे मिलिंद विज्ञान व कला महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

**इंटरनेट माझा मित्र**

इंटरनेटच्या आधारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित १० ग्रंथांची नावे लिहा.

**चर्चा करा**

या प्रकरणामध्ये अभ्यासलेल्या शैक्षणिक विचारवंतांचे शैक्षणिक विचार, शैक्षणिक योगदान आणि त्यांची ग्रंथसंपदा या मुद्द्यांना अनुसरून एक तौलनिक तक्ता तयार करून त्यावर वर्गामध्ये सामूहिक चर्चा करा. तसेच त्या चर्चेमध्ये प्रत्येक विचारवंताने कोणत्या बाबींवर विशेष रूपाने आवर्जून भर दिला यावरही चर्चा करा.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

(१) रवींद्रनाथ टागोर यांनी ·········· ची स्थापना केली.
(अ) श्रीनिकेतन
(ब) गुजरात विद्यापीठ
(क) फिनिक्स आश्रम
(ड) रामकृष्ण मिशन

(२) रामकृष्ण मिशनची स्थापना ··········· यांनी केली.
(अ) रवींद्रनाथ टागोर
(ब) स्वामी विवेकानंद
(क) महात्मा गांधी
(ड) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

(३) 'माझे सत्याचे प्रयोग' हे ·············· यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे.
(अ) रवींद्रनाथ टागोर
(ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
(क) महात्मा गांधी
(ड) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

**(ब) स्तंभ 'अ' आणि स्तंभ 'ब' यांतील योग्य सहसंबंध ओळखा व जोड्या जुळवा.**

| स्तंभ 'अ' (शैक्षणिक विचारवंत) | स्तंभ 'ब' (शैक्षणिक योगदान) |
|---|---|
| (१) रवींद्रनाथ टागोर | (अ) विद्यापीठ शिक्षण आयोगाचे अध्यक्ष |
| (२) स्वामी विवेकानंद | (ब) मूलोद्योगी शिक्षण पद्धतीचे जनक |
| (३) महात्मा गांधी | (क) बेलूर व ऋषिकेश मठाची स्थापना |
| (४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर | (ड) पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना |
| (५) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन | (इ) शांतिनिकेतन शाळेची स्थापना |


**(क) एक ते दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) रवींद्रनाथ टागोर यांनी तांत्रिक शिक्षणासाठी स्थापन केलेली शाळा कोणती?
(२) स्वामी विवेकानंद यांचे आध्यात्मिक गुरू कोण?
(३) महात्मा गांधी यांनी दक्षिण आफ्रिकेमध्ये स्थापन केलेल्या आश्रमाचे नाव लिहा.
(४) 'द बुद्‌ध अँड हिज धम्म' हा ग्रंथ लिहिणारे शैक्षणिक विचारवंत कोण?
(५) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे १९३१ ते १९३८ या कालावधीत कोणत्या विद्यापीठाचे कुलगुरू होते?

**(ड) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) विश्वभारती विद्यापीठाचे ब्रीदवाक्य कोणते?
(२) दलितवर्ग शिक्षण संस्थेची स्थापना कोणी केली?
(३) स्वामी विवेकानंद यांची शिक्षणाची व्याख्या लिहा.

**प्र.२ खालील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.३ खालील विधानांबाबत तुमचे मत नोंदवा.**

(१) शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे.
(२) मनाची एकाग्रता ही ज्ञानप्राप्तीची गुरुकिल्ली होय.
(३) विषमता नष्ट करण्याचा शिक्षण हाच राजमार्ग आहे.

**प्र.४ टिपा लिहा.**

(१) शांतिनिकेतन (२) बहिष्कृत हितकारिणी सभा
(३) रामकृष्ण मिशन (४) पीपल्स एज्युकेशन सोसायटी

**प्र.५ खालील बाबींवर प्रत्येकी ५० ते ८० शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) विश्वभारती विद्यापीठाची वैशिष्ट्ये
(२) मूलोद्योगी शिक्षण योजना

**प्र.६ खालील प्रश्नांची प्रत्येकी १०० ते १५० शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक योगदान स्पष्ट करा.
(२) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे शैक्षणिक विचार स्पष्ट करा.

**प्र.७ खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) महात्मा गांधी आणि रवींद्रनाथ टागोर यांच्या शैक्षणिक विचारांची तुलना करा.
(२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी खालील मुद्द्यांच्या आधारे माहिती लिहा.
(अ) शैक्षणिक विचार (ब) शैक्षणिक योगदान